IIP: WJHSS
IIP
World Journal of Humanities and Social Sciences

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 02 No. Issue I, (January-March) (2026)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# मानसोपचार पद्धतीचे मानसशास्त्रातील योगदान

[1] कु. शिंदे तेजश्री बाबासाहेब, [2]श्री नरोटे गोरक्ष लक्ष्मण
[1](एम.ए.भाग एक)
[2]मार्गदर्शक , मानसशास्त्र विभाग प्रमुख
रा. ब. नारायणराव बोरावके कॉलेज श्रीरामपूर (स्वायत्त)

**Article Info**

***Article History:***

Received: 20th February 2026

Accepted: 01st March 2026

Published: 07th March 2026

***Keywords:***

*मानसोपचार पद्धती, मानसशास्त्र योगदान*

**ABSTRACT**

मानसोपचार पद्धती मानसशास्त्राच्या विकासात अत्यंत महत्त्वपूर्ण ठरली आहे, कारण तिने केवळ मानसिक विकारांवर उपचार करणेच नव्हे, तर मानवी वर्तन, भावना आणि विचार यांच्या वैज्ञानिक अभ्यासाला ठोस दिशा दिली; मानसशास्त्रातील विविध सिद्धांतांना (जसे की सीबीटी, मनोविश्लेषण, मानवतावादी) व्यावहारिक स्वरूप दिले, आणि व्यक्तीच्या मानसिक कल्याणासाठी, स्व-समज व जीवनातील समाधानासाठी एक प्रभावी पुरावा-आधारित मार्ग उपलब्ध करून दिला. ज्यामुळे मानसशास्त्र एक उपचारात्मक आणि सामाजिक विज्ञान म्हणून विकसित झाले. मानसिक आरोग्य समस्यांवर वैज्ञानिक आणि व्यावहारिक उपाय पुरवून महत्त्वपूर्ण योगदान देते, ज्यामुळे व्यक्तींना भावनिक त्रास कमी करून, समस्यांची मूळ कारणे समजून घेऊन जीवनातील ताणतणाव हाताळण्यास आणि चांगले मानसिक आरोग्य प्राप्त करण्यास मदत मिळते.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: March 01, 2026
Similarity Index: 4%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2026 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Shinde, T. B., & Narote, G. L. (2026). मानसोपचार पद्धतीचे मानसशास्त्रातील योगदान. *IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS)*, 2(I), 1088–1092.

- **प्रस्तावना :-**

मानसोपचार पद्धती मानसशास्त्रातून उगम पावतात, मानवी मन, भावना आणि वर्तनाचे सखोल आकलन करून व्यक्तीला मानसिक त्रासातून बाहेर पडण्यास, स्वतःला समजून घेण्यास, निरोगी सामना करण्याची कौशल्ये शिकण्यास आणि एकूणच मानसिक आरोग्य सुधारण्यास मदत करतात, ज्यामुळे मानसशास्त्राच्या सैद्धांतिक ज्ञानाला प्रत्यक्ष उपचारात्मक उपयोगात आणून मानवी जीवनात सकारात्मक बदल घडतात. ही पद्धत नैराश्य, चिंता, नातेसंबंधातील समस्या आणि तणाव यांसारख्या विकारांवर प्रभावी ठरते, तसेच मेंदूतील बदलांवरही सकारात्मक परिणाम दाखवते, असे संशोधनातून सिद्ध झाले आहे. मानसशास्त्र हे मानवी मनाचा आणि वर्तनाचा अभ्यास करणारे शास्त्र आहे, ज्यातून प्राप्त झालेले ज्ञान मानसोपचार पद्धतींच्या विकासासाठी पाया ठरले आहे. मानसोपचार, ज्याला 'टॉक थेरपी' देखील म्हणतात, हे एक सहयोगी उपचार आहे, जिथे प्रशिक्षित व्यावसायिक रुग्णांना त्यांच्या विचारांना, भावनांना आणि वर्तणुकीला समजून घेण्यास आणि त्यावर नियंत्रण मिळवण्यास मदत करतात. मानसोपचाराने मानसशास्त्राच्या सिद्धांतांना (उदा. संज्ञानात्मक सिद्धांत, भावनिक नियमन) प्रत्यक्ष जीवनातील समस्यांवर उपाय म्हणून वापरले जाते, ज्यामुळे मानसशास्त्र हे केवळ एक शैक्षणिक क्षेत्र न राहता, ते थेट मानवी कल्याणासाठी योगदान देणारे एक प्रभावी साधन बनते.

मानवी जीवनातील ताणतणाव, मानसिक संघर्ष, भावनिक अस्थैर्य व वर्तनातील अडचणी यांवर उपचार करण्यासाठी मानसोपचार पद्धतींचा विकास झाला. मानसोपचार पद्धतींनी केवळ मानसिक आजारांच्या उपचारातच नव्हे, तर व्यक्तिमत्त्व विकास, आत्मसमज, भावनिक समतोल आणि सामाजिक समायोजन यांसारख्या क्षेत्रांतही महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. मनोविश्लेषण, वर्तनवादी, संज्ञानात्मक, मानवतावादी व समाकलित अशा विविध मानसोपचार पद्धतींमुळे मानसशास्त्र अधिक व्यावहारिक, प्रभावी व मानवकेंद्रित बनले आहे. त्यामुळे मानसोपचार पद्धतींचे मानसशास्त्रातील योगदान हे व्यापक, बहुआयामी व अत्यंत महत्त्वाचे ठरते.

- **संशोधनाचे उद्दिष्टे:-**

१.मानसोपचार संकल्पना समजावून घेणे.
२.मानसोपचार पद्धतींचे मानसशास्त्रातील योगदान जाणुन घेणे.

- **संशोधनाचे महत्त्व:-**

प्रस्तुत संशोधन हे मानसोपचार पद्धतींचे मानसशास्त्रातील योगदान व महत्व यांवरील संबधावरील आधारित आहे. प्रस्तुत संशोधनातून मानसोपचार पद्धतीचे संशोधन मानसिक आरोग्य सेवा सुधारण्यासाठी, प्रभावी उपचार पद्धती विकसित करण्यासाठी, उपचारांची परिणामकारकता सिद्ध करण्यासाठी आणि रुग्णांच्या गरजांनुसार उपचारांमध्ये बदल घडवण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे; यामुळे मानसिक आजारांचे निदान आणि व्यवस्थापन अधिक अचूक होते, ज्यामुळे रुग्णांचे जीवनमान सुधारते आणि त्यांना बरे होण्यास मदत मिळते, तसेच नव्या तंत्रज्ञानाचा वापर करून मानसिक आरोग्याच्या समस्यांवर नाविन्यपूर्ण उपाय शोधण्यासही संशोधनातून दिशा मिळते.

मानसोपचार पद्धतीचे मानसशास्त्रातील योगदान खूप मोठे आहे, कारण ती मानसिक आरोग्य समस्यांवर वैज्ञानिक उपाय प्रदान करते, व्यक्तीला भावना, विचार आणि वर्तनावर नियंत्रण मिळवण्यास शिकवते, समस्या सोडवण्यासाठी कौशल्ये विकसित करते, नातेसंबंध सुधारते आणि मेंदू व शरीरावर सकारात्मक परिणाम करते, ज्यामुळे एकूणच जीवनाची गुणवत्ता सुधारते आणि मानसिक आरोग्याच्या अभ्यासाला एक व्यावहारिक आणि परिणामकारक दिशा मिळते. प्रस्तुत संशोधनाचा फायदा शिक्षक, विद्यार्थी, संशोधक व्यावसायिक, नोकरदार पत्रकार या सर्वांनाच होईल.

- **संशोधन पद्धती:-**

प्रस्तुत संशोधनाचा विषय मानसोपचार पद्धतींचे मानसशास्त्रातील योगदान असुन प्रस्तुत संशोधन चिंतनात्मक स्वरूपाचे असून त्यासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर केला आहे. ह्या संशोधनासाठी कोणत्याही प्राथमिक साधनांचा वापर केलेला नसून दुय्यम माहिती संकलन साधनांचा वापर केला आहे. त्यासाठी विविध संदर्भ ग्रंथ, प्रकाशित साहित्य, इंटरनेट, संशोधन साहित्याचा आधार घेऊन ताणास सामोरे जाताना मानसशास्त्रीय तंत्राचे व्यवथापन स्पष्ट केले आहे.

- **उद्दिष्टे क्रमांक १ मानसोपचार संकल्पना समजावून घेणे.**

ओलबर्गच्या मतानुसार "मानसोपचार भावनिक स्वरुपाच्या समस्यांवरील उपचाराचा एक प्रकार असून ज्यामध्ये प्रशिक्षित व्यक्ती मानसिक आजारी व्यक्तीशी व्यावसीक संबंध प्रस्थापीत करते. ज्या माध्यमातून त्या व्यक्तीमध्ये सुधारणात्मक बदल घडवून आणने, वर्तन व्यवहारांचा बिघडलेला आकृतीबंध सुधारणे आणि वर्तमान स्थितीतील लक्षणांना दूर करण्याचा प्रयत्न केला जातो."

रॉटर (Rotter - 1976) च्या मतानुसार "मानसोपचार ही एक सुनियोजीत क्रिया असून जिचा उद्देश व्यक्तीच्या, जीवनात परिवर्तन घडवून आणण्यासाठी केला जातो. ज्या आधारे व्यक्तीच्या जीवनात अधिक समायोजनाची क्षमता वाढविता येते. वर्तनांमध्ये बदल घडवून आणण्यासाठी चिकित्सकाने केलेल्या तंत्राचे उद्देशपूर्ण उपयोजन म्हणजे मानसोपचार होय."

किसरच्या (Kisser) मतानुसार "मानसशास्त्रीय तंत्राद्वारे भावनिक आणि वर्तन विषयक त्रासावर केला जाणारा उपचार म्हणजे मानसशास्त्रीय उपचार होय."

"मानसोपचाराचे एक व्यापक उद्दिष्ट म्हणजे विकृत व्यक्तीच्या वर्तनामध्ये परिणामकारक, सकारात्मक, दीर्घकालीन बदल घडवून आणणे आणि त्यास परिणामकारक व सामान्य जीवन जगण्यास सक्षम करणे हे होय."

Wolbery यांच्या मते, मानसोपचाराची तीन उद्दिष्टे असावीत.

(१) विकृत वर्तन दर्शविणारे घटक नाहिशे करणे, त्यामध्ये बदल घडवून आणणे किंवा
त्याची तीव्रता कमी करणे.

(२) वर्तनातील विकृत घटक दुरूस्त करणे.

(३) सकारात्मक व्यक्तिमत्त्व वाढ, विकास, कार्यप्रणाली यांना चालना देणे.

**(१) अचूक वर्तन करण्याच्या दृष्टीने रुग्णाची प्रेरणा वाढविणे.**

रुग्णाचे वर्तन हे अनिष्ट असते त्या अनिष्ट वर्तनामध्ये बदल करून वर्तन योग्य करण्याच्या दृष्टीने रुग्ण व्यक्तिची प्रेरणा दृढ करणे, हे मनोचिकित्सचे प्रमुख उद्दिष्ट आहे. रुग्णाला असा विश्वास देणे की, तुमची विकृती बरी होईल.

**(२) भावनिक दबाव कमी करणे.**

रुग्णांच्या भावनांचा कोंडमारा झालेला असतो. त्या भावना अबोध असतात म्हणून त्याची अभिव्यक्ती होत नाही. भावना दडपणामुळे त्यामध्ये (रुग्णामध्ये) रोगाचे लक्षणे विकसित होतात. भावना दडपणामधील या रुग्णाच्या भावना उद्दिपीत करता येतात. फ्राईडने यांस भावविस्चन म्हटले आहे.

**(३) रुग्णांच्या स्व-वाढीकरिता रुग्णाला सुप्त शक्तीची जाणीव करून देणे**

रॉजर्स याने या उद्दिष्टासंबंधित रुग्णकेंद्रित सिद्धांत सांगितलेला आहे. स्वतःचा विकास करण्याच्या क्षमता प्रत्येक व्यक्तीकड़े असतात. मात्र, त्या सुप्त क्षमतांची व्यक्तीस जाणीव नसते. त्या क्षमतांची व्यक्तीस जाणीव करून देणे हा चिकित्सेचा उद्देश असतो त्यामुळे अनिष्ट वर्तन दूर होते.

**(४) सवयीमध्ये बदल घडवून आणणे**

चुकीच्या सवयीमुळे विकृती निर्माण होते हे रुग्णाच्या कक्षात आणून देऊन त्याच्या अनिष्ट सवयी दूर करणे यासाठी त्यांना त्यांची विकृती दूर होईल असे प्रबलन देणे.

**(५) रुग्ण व्यक्तीच्या बोधनिक संरचनेमध्ये बदल करणे**

अल्बर्ट एलिस यांनी विकसित केलेली तर्कसंगत भावनिक उपचार पद्धती असून त्यांच्यामते जगामध्ये काहीही चांगले किंवा वाईट नाही. व्यक्तीचा दृष्टिकोन हा चांगले वाईट ठरवितो. त्यांच्यामते घटनेत चांगले वाईट नसून व्यक्तीमध्ये आहे. म्हणजे आपल्या बोधनामुळे व्नक्ती चांगले वाईट ठरविते. एलिसच्या मते, स्वतः रुग्णाचे बोधन चुकीचे असेल तर त्याचे धनात्मक बोधन करणे हा उद्देश असावा.

**(६) जीवनासंबंधी परिणामकारक निर्णय घेण्याकरिता रुग्णाचे ज्ञान व क्षमता वाढविणे.**

रुग्णामध्ये कोणती बलस्थाने आहेत? त्याच्या उणिवा कोणत्या आहेत? हे रुग्णाच्या लक्षात आणून दिल्यावर त्याच्या स्व-जाणिवेचा विकास होईल.

**(७) आंतर-वैयक्तिक संबंध आणि संप्रेषण सुधारणे.**

आंतर-वैयक्तिक संबंध आणि संप्रेषण बिघाडल्यामुळे विकृत वर्तन निर्माण होते, असे काही चिकित्सकाचे मत आहे. जर समाजच विकृत असेल तर त्यातील सामान्य व्यक्ती ही विकृतच राहील. त्याचा निश्चितच रुग्णाच्या वर्तनावर परिणाम होतो म्हणून आंतर-वैयक्तिक संबंधामध्ये सुधारणा होणे आवश्यक असते.

**(८) दुःखद भावना कमी करण्याकरीता शारीरिक प्रक्रियेत बदल करणे.**

शरीर व मनाला वेगळे करता येत नाही. मानसिक लक्षणामुळे शारीरिक क्रिया सदोष होव शकतात. शारीरिक क्रिया दुरुस्त करण्याचा प्रयत्न केला तर त्याचा परिणाम रुग्णांच्या मानसिक परिस्थितीवर झाला तर त्याची लक्षणे दूर करता येतात. रुग्णांच्या शारीरिक उणीवेची जाणीव करून देणे हे देखील उद्दिष्ट आहे.

**(९) रुग्ण व्यक्तीच्या सामाजिक पर्यावरणात परिणामकारक बदल घडवून आणणे.**

या वादाच्या पुरस्कर्त्यांच्या मते व्यक्ती विकृत नसून सर्व रुग्णाच्या सभोवतालचे वातावक्षरण समान विकृत असते. सामाजिक

परिस्थितीमुळे व्यक्तीमध्ये बदल होतात म्हणून सामाजिक पर्यावरणात बदल घडवून रुग्ण व्यक्तीची लक्षणे दूर करणे कारण विकृतीचे मूळ हे पर्यावरणामध्ये असते म्हणून पर्यावरणात शक्य तो परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न करावा.

**(१०) रुग्ण व्यक्तीच्या क्षमतांची व योग्यताची जाणीव करून देणे.**

अशी जाणीव रुग्ण व्यक्तीला करून दिली तर त्याची विकृतीतून सुटका होऊ शकते. स्व-जाणीव वाढविण्याकरिता बोधावस्थेच्या स्थितीत बदल करणे आवश्यक असते.

**मानसोपचाराचे दृष्टिकोन**

**(१) गतिशील / मानसगतिकी दृष्टिकोन**

विचारवंताच्या मते, व्यक्ती आपल्याला येणाऱ्या दुःखद, अपमानास्पद, अपयशी, वांछनास्पद प्रसंगाचे दमन करत असते. त्यामुळे क्लेशदायक प्रसंग विसरले जातात. परंतु त्यापासून निर्माण होणारी चिंता व्यक्तीला त्रासदायक वाटते. या चिंतेपासून बचाव करण्यासाठी व्यक्ती नकळत अहं संरक्षण यंत्रणाचा  वापर करते ज्या व्यक्ती विशिष्ट मयदिपलीकडे संरक्षक यंत्रणांचा वापर करतात त्या मानसिक रुग्ण बनतात. थोडक्यात ह्या विचारसरणीच्या तंज्ञाच्यामते, विकृत वर्तन अबोध प्रेरणेतून निर्माण होते. म्हणून सर्व मनोविश्लेषण तंत्रातून व्यक्तीच्या अबोध प्रेरणा समजावून घेण्याचा प्रयत्न केला जातो.

**(२) वर्तनात्मक दृष्टिकोन**

व्यक्तीमध्ये जे प्रतिकूल वर्तन विकसित होते. ते का निर्माण होते? याबाबतीत असे म्हणता येईल की, व्यक्तीच्या अंगी ज्या असंख्य वाईट सवयी दृढ झालेल्या असतात अशा दृढ व वाईट सवयीने त्या व्यक्तीत तशीच मानसिक लक्षणे निर्माण होतात या लक्षणांचा विशिष्ट क्रम असतो. वाईट सवय असल्यास ती दृढ होऊन तिच्या वर्तनात प्रतिकूल परिणाम होतो म्हणजेच वर्तन विकृत होते. या विकृत सवयी दूर करावयाच्या असतील तर रुग्णांचे प्रतिकूल वर्तन हे अनुकूल करावे लागेल, म्हणजे ज्या सवयी अध्ययनाने दृढ झाल्या अशा सवयींना अध्ययनाच्या माध्यमातूनव दूर केले जावे आणि रुग्ण चांगला व्हावा असे चिकित्सकांचे / मानसतज्ज्ञांचे मत आहे.

**(३) भावना आणि विश्वास यासंबंधित दृष्टिकोन**

रुग्णांच्या भावना, विचार समजणे किंवा समजून घेणे हे चिकित्सकाचे काम आहे. रुग्णांच्या भावनांचा अर्थ रुग्णाला समजावून सांगणे हे चिकित्सकाचे महत्त्वाचे कार्य असते. रुग्णाचे वर्तनबोधन हे अयोग्य असते व अशा वर्तनाचा योग्य अर्थ कोणता हे रुग्णाला समजावून सांगणे व चुकीचे कोणते हे देखील समजावून सांगणे. म्हणजेच तू जे समजतो ते खोटे आहे असे समजावणे. त्यामुळे त्याच्यामध्ये अंतर्दृष्टी निर्माण होते व त्याला कळते मी असे वागायला नको होते, त्यामध्ये विश्वास महत्त्वाचा आहे. यालाच तिसऱ्या शक्तीचा दृष्टिकोन म्हटले जाते. (संदर्भ - रॉजर्स अस्तित्ववादी विचारसरणी) प्राचीन काळी मानसशास्त्र हे आत्म्याचे शास्त्र आहे'असा समज होता.मानसशास्त्र हे योगदानात्मक शास्त्र आहे कारण ते मानवी मन आणि वर्तनाचा अभ्यास करून मिळवलेले ज्ञान प्रत्यक्षात जीवनातील समस्या सोडवण्यासाठी, सकारात्मक बदल घडवण्यासाठी आणि मानवी कल्याण सुधारण्यासाठी वापरते, जसे की शिक्षण, आरोग्य, व्यवसाय आणि न्याय यांसारख्या क्षेत्रांमध्ये वर्तणूक सुधारणे, उपचार देणे आणि कार्यक्षमता वाढवणे. हे केवळ सैद्धांतिक नसून, निरीक्षण,प्रयोग आणि डेटा वापरून मानवी अनुभवांना आणि वर्तनाला समजून घेते, ज्यामुळे त्याचे उपयोग व्यावहारिक  आणि परिणामकारक ठरतात. शैक्षणिक, आरोग्य आणि सामाजिक समस्या सोडवण्यासाठी मानसशास्त्राच्या ज्ञानाचा वापर केला जातो, जसे की शिक्षण पद्धती सुधारणे किंवा मानसिक आरोग्य सुधारणे. मानसशास्त्राचे निष्कर्ष आरोग्य, शिक्षण, न्याय आणि व्यवसाय यांसारख्या क्षेत्रांमध्ये लागू होतात, ज्यामुळे लोकांचे जीवन सुधारण्यास मदत होते. मानसशास्त्र निरीक्षणा, प्रयोगांच्या माध्यमातून वैज्ञानिक सिद्धांत तयार करते आणि या सिद्धांतांचा उपयोग क्षेत्रांमध्ये सकारात्मक बदल घडवण्यासाठी करते, जसे की वर्तणूक थेरपी, मानसिक आरोग्य सेवा, आणि शिकवण्याच्या पद्धती सुधारणे.

- **उद्दिष्टे क्रमांक २ मानसोपचार पद्धतींचे  मानसशारत्रातील योगदान जाणुन घेणे.**

मानसोपचार पद्धतीचे मानसशास्त्रातील योगदान प्रचंड आहे, कारण ती केवळ मानसिक आजारांवर उपचार करत नाही तर मानवी भावना, विचार आणि वर्तनाचे सखोल आकलन देते, ज्यामुळे व्यक्तीला निरोगी सवयी, उत्तम भावनिक नियंत्रण, मजबूत नातेसंबंध आणि जीवनातील आव्हानांना सामोरे जाण्याची क्षमता विकसित करता येते, तसेच मेंदूतील सकारात्मक बदल घडवून आणते आणि एकूणच मानसिक व शारीरिक आरोग्यात सुधारणा घडवते. जीवनातील आव्हानांना सामोरे जाण्याची क्षमता विकसित करता येते, तसेच मेंदूतील सकारात्मक बदल घडवून आणते आणि एकूणच मानसिक व शारीरिक आरोग्यात सुधारणा घडवते. मानसोपचार व्यक्तीला तणाव, नैराश्य, नातेसंबंधातील समस्या आणि इतर जीवनातील आव्हानांना तोंड देण्यासाठी नवीन आणि निरोगी सामना करण्याच्या तंत्रांची शिकवण देते.मानसोपचार म्हणजे मानसशास्त्रज्ञ, मानसोपचारतज्ज्ञ किंवा इतर मानसिक आरोग्य प्रदात्याशी बोलून मानसिक आरोग्य समस्यांवर उपचार करण्याचा एक दृष्टिकोनसकारात्मक मानसशास्त्राने मानसोपचारात

कल्याण आणि मानवी उत्कर्षावर लक्ष केंद्रित करून एक नवीन दिशा दिली आहे, जी केवळ लक्षणांवर उपचार करण्याऐवजी व्यक्तीच्या सर्वोत्तम क्षमतेवर भर देते.

**निष्कर्ष**

१) मानसोपचार ही एक सहयोगी प्रक्रिया म्हणून अधोरेखित केली आहे. ज्याचा उद्देश व्यक्तींच्या विचारांमध्ये आणि वर्तनांमध्ये समज आणि सकारात्मक बदल घडवून आणणे आहे.

२) मानसोपचार पद्धतीमुळे मानसशास्त्राला व्यक्तीच्या भावना, विचार आणि वर्तनांचे सखोल आकलन झाले आहे, ज्यामुळे मानसिक विकारांवर प्रभावी उपचार (उदा. नैराश्य, चिंता), भावनिक संतुलन, आणि आत्म-जागरूकता वाढवण्यासाठी वैज्ञानिक आधार मिळाला, हे उपचार मानवी कल्याणासाठी महत्त्वाचे आहेत, मेंदूच्या कार्यात सकारात्मक बदल घडवतात आणि दैनंदिन जीवनातील समस्या सोडवण्यासाठी प्रदान करतात.

**संदर्भ ग्रंथ:-**

१) जोशी. वि.,(२००८) *ताण विमनस्क अवस्थेतून तोल सावरण्यापर्यंत.* प्रथमावृत्ती , पुणे, डायमंड प्रकाशन.
२) तडसरे. वि. दि., (२००१) *मानसशास्त्र.*कोल्हापूर, फडके प्रकाशन.
३) तडसरे. वि. दि., (२००६) *उपयोजित मानसशास्त्र.* प्रथमावृत्ती, कोल्हापूर, फडके प्रकाशन.
४) बर्वे. बी. एन., (२०१०) *चिकित्सा मानसशास्त्र.* प्रथमावृत्ती , नागपूर, विद्या प्रकाशन.
५) राजहंस. मानसी., पाटील, अनघा., सुर्वे. सुशील., (२००१) *अपसामान्यांचे मानसशास्त्र.* पुणे, उन्मेष प्रकाशन.
६) पवार. बी. एस., चौधरी जी. बी., (२००४). *समुपदेशन मानसशास्त्र.* प्रथमावृत्ती, पुणे,प्रशांत पब्लिकेशन्स.
७) www.google.co.in